**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : भागवत भाउसाहेब लांबे**
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : सेवा निवृत्त,
राहणार : जि.नाशिक.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए.व्ही.बाबर**

१. मी रामदास कुलट, राजेंद्र होले व महेश राजुरकर यांना ओळखतो. ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

२. सन २०१७ साली मी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, विभागीय कार्यालय, नाशिक येथे प्रभारी विभागीय व्यवस्थापक म्हणुन कार्यरत होतो. सदरची संस्था ही महाराष्ट्र शासनाची नोडल ऐजन्सी असून ती शासनाने वेळोवेळी राबविलेल्या योजनेअंतर्गत कृषी अवजारे, खते, पशुखाद्य, जंतुनाशके व नोगा उत्पादने इत्यादी कृषी साहित्य वाटप करण्याचे काम करतात. अहमदनगर व नाशिक हे दोन्ही विभाग आमच्या नाशिक विभागीय कार्यालयाअंतर्गत कृषी साहित्य वाटपासाठी येतात. अहमदनगर करिता वाटप कार्यालय म्हणुन मार्केट यार्डमध्ये आमचा उपविभाग आहे. आरोपी हे आमच्या अहमदनगर येथील उपविभागामध्ये कार्यरत होते. कुलट हे लिपीक म्हणुन, राजेंद्र होले हे सहायक व्यवस्थापक व राजुरकर हे देखील सहायक व्यवस्थापक म्हणुन कार्यरत होते. लिपीक पदाकरिता बॅंकेचे सर्व व्यवहार पाहणे, आलेल्या पैशांचे नोंदी घेणे, आलेले पैशांच्या पावत्या देणे, टपालाची आवक जावक पाहणे इत्यादी काम करावे लागते. होले हे अहमदनगर उपविभागातील शाखेचे प्रमुख होते. राजुरकर हे पशुखाद्य विभागासंबंधी सर्व कामकाज पाहण्याचे काम करत होते. वर नमूद कृषी साहित्य हे उत्पादकाकडुन पुरवठा झाल्यानंतर त्याचे पेमेंट अदा करण्यासाठी आमच्या विभागीय कार्यालयाकडुन त्या पुरवठयाची पावती आल्याशिवाय रक्कम मिळत नव्हती व ती घेण्याकरिता विभागीय कार्यालयातून आमच्या प्रमुख कार्यालयाच्या नावे तशी रक्कम अदा करण्याबाबतची पावती बनवुन

पाठविणे गरजेचे होते.

३. आम्ही लक्ष्मी ड्रकेन्स सोलापूर यांच्याकडुन कृषी साहित्य पुरवठा अहमदनगर येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कर्जत येथे घेतला होता. त्यांनी संबंधित कार्यालय तसेच आमच्या विभागीय कार्यालयापर्यंत त्यांना रक्कम अदा झालेली नाही असे वेळोवेळी कळविले तेव्हा आमच्या कार्यालयामार्फत त्याची चौकशी केली तेव्हा लक्ष्मी ड्रकेन्स यांच्याकडुन कृषी साहित्य पुरवठा झाल्याचे दिसून आले पण त्यांना त्या पुरवठयाच्या रकमेबाबात कोणतीही पावती दिली गेलेली नाही असे कळाले व त्यांनी पुरवठा केलेल्या कृषी साहित्याकरिता उन्मेश फर्टीलायझरर्स, चांदा, ता. नेवासा या खत विक्रेत्याच्या नावे दिली गेली असल्याचे आढळले. आम्ही याबाबत नगर येथील आमच्या कार्यलयात विचारणा केली तेव्हा अनावधानाने अशी चूक झाल्याचे त्यांनी सांगितले. आम्हाला कार्यालयाकडुन मिळालेले उत्तर समाधानकारक वाटले नाही म्हणुन आम्ही त्या प्रकरणाव्दारे इतर खात्यांचीही सखोल चौकशी केली. तेव्हा आमच्या निदर्शनास आले की, ब—याच रकमा अथवा धनादेश, डी.डी. हे त्यांच्या नावावर जमा न होता इतर खत पुरवठाधारक किंवा बचतगट यांच्या नावावर जमा झालेले आहेत. म्हणुन आम्ही सदरची बाब आमच्या मुख्य कार्यालयाला कळविली. मुख्य कार्यालयामार्फत नगर उपविभागाचे ऑडीट करण्यात आले. ते ऑडीट वासुदेव महाले, सहायक व्यवस्थापक यांच्या मार्फत करविण्यात आले. त्या ऑडीटमध्ये आम्हाला अहमदनगर उपविभागामध्ये आर्थीक गैरव्यवहार झाल्याचे कळविण्यात आले. ऑडीटमध्ये प्रथमदर्शनी रू.६६,०३,५९८/— इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले. नगर येथील चौदा तालुक्यांमध्ये हा आर्थीक गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले होते. सदरची रक्कम ही आठ खतविक्रेते व काही बचत गट यांच्या नावे जमा झाले असल्याचे दिसून आले होते. त्या खतविक्रत्यांमध्ये उन्मेश फर्टीलायझर्स चांदा, के. प्रकाश, अहमदनगर, अभिशेख फर्टीलायझर्स, साकुद, पचोरिया वांबोरी, अक्षय फर्टीलायझर्स, संदीप फर्टीलायझर्स, बारागांव नांदूर, संत सावता कृषी सेवा केंद्र व माउली कृषी

सेवा केंद्र इत्यादी नावे आहेत.

४. त्यानंतर आमच्या मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या सुचनेनुसार मी सदर आर्थीक गैरव्यवहाराची कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे तक्रार दाखल केली. मला आता तक्रार अर्ज दाखविला. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५६** देण्यात येते.

५. फिर्याद दाखल केल्यानंतर पोलीसांनी पुन्हा माझेकडे चौकशी करून माझा पुरवणी जबाब नोंदविला होता.

बरेच कागदपत्र मुद्देमालाअंतर्गत आज दाखल झाल्याने पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर

**दि.२२/१२/२०२२**

**शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए.व्ही.बाबर**

६. सन २०१२ ते सन २०१७ पर्यंत आर्थिक गैरव्यवहार उपविभागीय कार्यालय, अहमदनगर येथे झाल्याचे आम्हाला दिसून आले होते. आमचे मुख्य कार्यालय, मुंबई यांनी श्री.महाले यांना ऑडीट कामी नियुक्त केले होते व महाले यांनी आमच्या उपविभागीय कार्यालयातून सर्व दस्तऐवजांचे ऑडीट केले तेव्हा त्यांना एक कोटी वीस लाख अठयान्नव हजार इतका आर्थीक गैरव्यवहार अहमदनगर उपविभागीय कार्यालय येथे झाल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या अहवालानूसार आर्थीक गैरव्यवहार हा श्री.रामदास कुलट, श्री.राजेंद्र होले व महेश राजूरकर यांनी केल्याचे नमूद केलेले आहे व त्यांनी सदर

लोकांविरूध्द चौकशी करावी असाही अहवाल दिला होता. मला आता दाखल मुद्देमालापैकी पहिला व दुसरा ऑडीट रिपोर्ट दाखविला. त्यावर ऑडीट करणार म्हणुन महाले यांची सही आहे. मी महाले यांच्यासोबत काम केलेले आहे व त्यांनी आमच्या संस्थेकरिता बरेच ऑडीट रिपोर्ट तयार केलेले आहेत म्हणुन मला त्यांची सही माहिती आहे. मला महालेंनी ऑडीट रिपोर्ट दिल्यानंतर त्या ऑडीट रिपोर्टमध्ये सुचविलेल्या मुद्याप्रमाणे मी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधुन चौकशी केली होती व त्या चौकशीदरम्यान तो अहवाल मला खरा असल्याचे दस्तऐवजांच्या आधारे दिसून आले. मला महाले यांचेशी सदर अहवालाबाबत जेव्हा बोलणे झाले तेव्हा त्यांनीही त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितलेले आहे. महाले हे सध्या हयात नाही त्यांचा मृत्यु झालेला आहे. सदर अहवालास आरोपीच्या वकीलांनी निशाणी देण्यासाठी हरकत घेतली व युक्तीवाद केला की, सदर दस्त हे प्रस्तुत साक्षीदाराच्या नावे नाहीत अगर त्यावर प्रस्तुत साक्षीदाराची मिळाले म्हणुन सही नाही. साक्षीदाराने सांगितले की, अहवालामध्ये पत्र क्र.७१७१, दि.०५/१०/२०१७ चा नियुक्तीबाबतचा जो उल्लेख आहे तो आमच्या मुख्य कार्यालयामार्फत झालेला आहे तसेच दुसरा अहवाल मिळाल्याबाबत आमच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक यांच्या सहया आहेत. अहवालामध्ये महालेंना कोणी नियुक्त केले याबाबत पत्राचा उल्लेख आहे व साक्षीदाराने त्याचे सरतपासात त्या व्यक्तीची नियुक्ती कशाच्या आधारे झाली याचा खुलासा केलेला असल्याने व दुस—या अहवालावर प्राप्त म्हणुन जी सही आहे ती साक्षीदाराने ओळखुन सदर अहवाल हा चौकशी दरम्यान पोलीसांना फिर्यादी संस्थेमार्फत दिला गेला असल्याचे दिसते. सबब, सद्य स्थितीत त्यास आरोपीची हरकत बाजुला सारून **नि.क्र.५७** व **नि.क्र.५८** देण्यात येते.

७. मी जेव्हा प्राथमिक चौकशी केली होती तेव्हा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कर्जत यांनी जो डीमांड ड्राफ्ट पंपसेट पुरवठयापोटी एम.ए.आय.डी.सी.च्या नावे दिला होता तो डी.डी. उन्मेश फर्टीलायजर्स यांचे

नावे जमा झाला होता. मला आता जप्त मुद्येमाल तीन पैकी पान क.२२ वर दाखल पावती क.१४५६२ दाखविली. हीच ती पावती आहे ज्याव्दारे उन्मेश फर्टीलायझर्सच्या नावे पैसे जमा केले गेलेले आहेत. ती कृषी अभियांत्रिकी विभागाची असताना खतविभागात जमा झाल्याचे त्या पावतीवरून दिसते. सदर पावती ही साक्षीदाराने बनविलेली नाही परंतु ती पावती प्राथमिक चौकशी दरम्यान साक्षीदाराने पाहणी केली होती व प्रस्तुत प्रकरणामध्येही ती वादग्रस्त असल्याने त्यास ओळख म्हणुन **नि.क.५९** देण्यात येते.

न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क.१०, अहमदनगर

**दि.०६/०१/२०२३**